
# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 08 : Issue 6 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday 22 Feb To 28 Feb 2022 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०८ * अंक : ६ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, २२ फेब्रु. ते २८ फेब्रु. २०२२ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३

## २२ फेब्रुवारी पासून सिग्नल तोडल्यास दंड

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली शहरात स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत बसविण्यात आलेले सिग्नल कार्यान्वित विभागाकडून ई-चलान प्रणाली २२ फेब्रुवारीपासून सुरु केली जाणार असल्यचे जाहीर करत सोमवारी



करण्यासाठी अखेर मुहूर्त सापडला असून आज २२ फेब्रुवारीपासून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

सिग्नलवर वाहने थांबण्यासाठी नियंत्रण रेषा आखण्यात आली आहे. या रेषेबाहेर वाहन गेले तर वाहनचालकांना दंडाला सामोरे जावे लागणार असून सिग्नल तोडून सुसाट वेगाने जाणाऱ्या वाहनचालकाला ई-चलान धाडले जाणार आहे. वाहतूक याबाबत प्रत्येक सिग्नलवर जनजागृती करण्यात आली.

कल्याण-डोंबिवली शहरात आधारवाडी चौक, खडकपाडा चौक, संदीप हॉटेल चौक, प्रेम ऑटो पौर्णिमा चौक, आनंद दिघे चौक, स्मशान भूमीजवळ कल्याण पूर्व, कोळसेवाडी या ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच अपघातावर नियंत्रण आणण्यासाठी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सीसीटीव्ही आणि सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली असून या यंत्रणेचे उल्लंघन करून वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा आज, २२ फेब्रुवारी पासून उचलला जाणार आहे.

वाहन चालकांना वाहतूक नियमन करण्यासाठी सिग्नलजवळ पांढऱ्या रंगाच्या स्टोफ लाईन आखण्यात आल्या असून या रेषेच्या मागे वाहने उभी करावीत अन्यथा सदर वाहन चालक सीसीटीव्हीत कैद झाल्यास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या रेकॉर्डनुसार ऑनलाइन चलान त्याच्या पत्त्यावर धाडले जाणार आहे. प्रथम नियम मोडल्यास ५०० रुपये आणि त्यानंतरच्या प्रत्येक नियमभंगासाठी प्रत्येकी १५०० रुपयांचा दंड आकारला जाणार असल्याने वाहनचालकांनी सिग्नल न तोडता नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले होते.

## बँकांनी ग्राहकाभिमुख बनावे - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन



**मुंबई** : देशातील उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी त्यांना तत्काळ भांडवल उपलब्ध व्हावे म्हणून देशातील बँकांनी ग्राहकाभिमुख बनावे, असे आवाहन सोमवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केले. बँका ग्राहकाभिमुख बनल्यास नव्याने उद्योग सुरु करणाऱ्या स्टार्टअपची जादा व्याज दराच्या कर्जातून सुटका होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन प्रथमच मुंबईच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आल्या असून त्यांची सोमवारी उद्योजक आणि बँकींग प्रतिनिधींसोबत बैठक झाली. यावेळी त्यांनी बँकिंग व्यवसायात आणची सुसूत्रता आणणे आवश्यक असल्याचे सांगितले.

## कल्याण डोंबिवली महानगर पालिकेत शिवजयंती उत्साहात साजरी



**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत आज शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली गेली. कल्याण पश्चिमेतील शिवाजी चौकातील शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महापालिका मुख्यालयातही महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याच प्रमाणे आयुक्त दालनात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य प्रतिमेस व अर्ध पुतळ्यास देखील पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, उपायुक्त पल्लवी भागवत, उपायुक्त (कर) विनय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता सुनिल जोशी, महापालिका सचिव तथा विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, कार्यकारी अभियंता योगेंद्र राठोड, क प्रभागचे सहा. आयुक्त सुधीर मोकल, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

डोंबिवलीतही महापालिकेचे विभागीय उपायुक्त सुधाकर जगताप यांनी मानपाडा रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी ग प्रभागाच्या सहा.आयुक्त रत्नप्रभा तायडे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत पाच माजी नगरसेवकाचा शिवसेनेत प्रवेश

**कल्याण** : निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेने आपल्या कक्षा वेगाने विस्तारण्यास सुरुवात केली असून पालिका क्षेत्रातील हक्काच्या जागा स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न चालविला आहे. भाजपाच्या बलाढ्य नगरसेवकाना शिवसेना प्रवेशाचे आमंत्रण दिले जात असून दुसरीकडे आपले अस्तित्व टिकविण्याच्या प्रयत्नात असलेल्या नगरसेवकांना शिवसेना प्रवेशाचे वेध लागले आहेत. युवा नेते पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे कल्याण डोंबिवलीतील विकासकामाचे भूमिपूजन आणि उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत भाजपा नगरसेवक रंजना पाटील त्यांचे पती नितीन पाटील, वृषाली जोशी त्यांचे पती रणजीत जोशी, कॉंग्रेसचे नगरसेवक रवी पाटील शिवसेनेत प्रवेश केला. या सर्व नगरसेवकांनी आपण सेनेत प्रवेश करणार असल्याचे २४ तासापूर्वीच जाहीर केले आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे १७ माजी नगरसेवक शिवसेनेच्या वाटेवर असल्याचे शिवसेनेच्या गोटातून सांगितले जात होते. यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत चार नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला असून आणखी भाजपचे दोन नगरसेवक आणि तीन माजी नगरसेवक अशा ५ नगरसेवकानी शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला



असून स्वत:चे मतदार संघ सुरक्षित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. तर आणखी भाजपचे काही नगरसेवक देखील सेनेच्या वाटेवर असल्याचे सांगितले जात आहे.

## मनसे सोडून जाणाऱ्यांना मी बघून घेईन

### राजू पाटलांचा 'गयारामांना' इशारा

**डोंबिवली** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक कधीही लागू शकते. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. येणाऱ्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आता मनसेने सुद्धा जोरदार तयारी सुरू केली आहे. दरम्यान मनसेने मेळावा भरवत आणि सुमारे८०० जणांना मनसेत प्रवेश देत शक्ती प्रदर्शन केले आहे.



या मेळाव्यात मनसे आमदार राजू पाटील यांनी पक्ष सोडून जाणाऱ्यांना मी बघून घेईल असा सज्जड दम दिला आहे. आमदार यांनी सांगितले की एक भव्य कार्यक्रम लवकर होणार आहे. त्या कार्यक्रमात मनसेची ताकद काय हे माहीत पडेल. कोणी भ्रमात राहू नये. फक्त अफवा पसरविली जात आहे. हा चालला, तो चालला, कोणी जात नाही. कोणी जाणार नाही. कोणी गेला तर त्याला बघून घेईन, असा सज्जड दम त्यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे.




## सचिन शिरसाट यांच्यातर्फे सचिन दादा शिरसाट चषक २०२२ चे आयोजन

**कल्याण** : दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा कल्याण मधील बेतुरकर पाडा शिशू विकास शाळेच्या प्रांगणात प्रभाग क्रमांक ११ समाजसेवक सचिन शिरसाट यांच्या माध्यमातून ठेवण्यात आलेला सचिन दादा शिरसाट चषक २०२२ जोमात रंगला. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी समाजसेवक सचिन शिरसाट आणि मयुरी ताई शिरसाठ यांच्या वतीने एका पॅनल प्रमाणे तीन प्रभागातील खेळाडूंसाठी या स्पर्धेचे आयोजन केले . ज्यामध्ये ३० संघांचे सामने रंगले. आमच्या माध्यमातून आयोजित केलेल्या स्पर्धेमधून आम्ही विविध खेळाडूंना उच्च स्तरावर आज पर्यंत पोहचाविले आहे. तसेच आता थेट आपल्याच प्रभागातून खेळाडू पुढे जावा या उद्देशाने आम्ही या स्पर्धेचे



आयोजन केले असल्याची स्पष्टोक्ती सचिन शिरसाठ यांनी केली आहे.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती शिवसेना उपशाखाप्रमुख अतुल शिंदे, माजी नगरसेविका वैशाली पाटील, एकनाथ सारोळकर, संदीप गडगे, समाज सेवा सचिन शिरसाठ, समाजसेविका मयुरी शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सचिन बोडके, देवेंद्र साळी, प्रसाद साबळे, अनिरुद्ध सोनवणे, ओकार उपाध्याय, राज सोनी, सुमित बाविस्कर ,स्वराज भालेराव, विराज भालेराव,

(पान ३ वर)

## कल्याण शहरात प्रथमच संपन्न झाला हौशी नाट्य महोत्सव

**कल्याण** : सांस्कृतिक वारसा लाभलेल्या कल्याण शहरात श्री शिवाजी शिंदे ( राज्यनाट्यस्पर्धा समनव्ययक ) यांच्या संकल्पनेतून प्रथमच आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे हौशी नाट्य महोत्सव संपन्न झाला. यात कल्याण शहरातील सात नामवंत नाट्यसंस्थांनी सहभाग घेतला.



उद्योजक स्व. जयकुमार पाठारे (फाउंडर ऑफ व्हीआयपी क्लोथिंग इंडस्ट्री) व स्व. शरदचंद्र माथव ओक यांच्या स्मरणार्थ या हौशी नाट्य महोत्सवाचे आयोजन नाट्य परिषद मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य व नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी केले होते. दि१५ फेब्रुवारी ते दि १८ फेब्रुवारी या कालावधीत कल्याणच्या सात नामवंत हौशी नाट्य संस्थांनी यात सहभाग घेतला होता. या सातही नाट्य संस्थांचे नाट्यप्रयोग सोमवार दि २१ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेत होणार आहेत. महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी लेखक दिग्दर्शक श्री. आनंद म्हसवेकर व नाट्य सिने अभिनेत्री ज्योती निसळ हे प्रमुख अतिथी लाभले होते. विश्वनाथ भोईर, शिवसेना आमदार कल्याण प. तसेच महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार सेना ठाणे जिल्ह्याचे संयुक्त सरचिटणीस श्री. नारायण पाटील, चिटणीस श्री. दिलीप सावंत व चिटणीस श्री. विजेंद्र चौधरी यांचे सौजन्य या महोत्सवास लाभले. विजय (बंड्या) साळवी, प्रफुल्लशेठ गवळी, सुनील पाठारे व सुनिता अरविंद वैद्य यांचे विशेष सहकार्य या महोत्सवास लाभले. सृजन प्रतिष्ठान वाशिंद, कल्याण तालुका शिक्षण सामाजिक शैक्षणिक संस्था, भारतीय मानव विकास संघ सामाजिक शैक्षणिक संस्था, अनुराग कल्याण, नवांकुर संस्कार मंच, ज्ञानमैत्री सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे सुबोध चित्र, एम्पिरिकल फाउंडेशन या संस्थांनी या महोत्सवात सहभाग घेतला होता. महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेपूर्वी पूर्व तयारीकरीता नाट्य

(पान २ वर)

## संपादकीय...

### काय चाललं काय आहे महाराष्ट्रात?

सर्वच राजकारणी पातळी सोडून वागत आहेत. बातम्या बघायचा तर किळस येत आहे. त्यापेक्षा त्या फालतू टी .व्ही सिरियल्स बऱ्या वाटायला लागल्या आहेत. मला आठवत आहेत ते दिवस. फेब्रूवारी २०१५ नंतरचे. अरविंद केजरीवाल यांनी ७० पैकी ६७ जागा जिंकून ऐतिहासिक विजय मिळवला होता. आणि भाजपाला हा मोठ्ठा धक्का होता. केंद्रात मोदी सरकार असतांना देशाच्या राजधानीत कोण्या टपऱ्या केजरीवालची सत्ता येणे, हे जणू मोदींना मान्यच नव्हते. आणि मग सुरु झाली असहकाराची भूमिका. अगदी ठरवून, प्लॅन करून, अगदी दिल्लीच्या नायब राज्यपाल नजीब जंग ह्यांनाही हाताशी धरुन,केजरीवाल सरकारला कामंच करु द्यायचे नाही हे मोदींनी ठरवलं. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर सीबीआय, ईडी, इन्कमटॅक्स वगैरे सगळे लावून झाले. सरकार चालवण्याऐवजी केजरीवालना सतत धरणं देत बसावं लागत होतं . मग सर्वोच्च न्यायालयाने काही निर्देश दिले आणि मोदींनी माघार घेतली. ह्या सगळ्या प्रकाराला कंटाळून नायब राज्यपालांनी सुद्धा राजीनामा दिला.

महाराष्ट्रातही तसंच चालू आहे, असे नाही वाटत? २०१९ पासून होता-तोंडाशी आलेली सत्ता महाविकास आघाडीच्या हातात गेली म्हणून जो काय राग-राग करायचाय तो २०२२ आलं तरी चालूच आहे. दिल्लीत नायब राज्यपालांना हाताशी धरलं होतं . इथे राज्यपाल कोशियारींना हाताशी धरून महाविकास आघाडीला नामोहरम करण्यात येत आहे. अगदी दिल्ली सरकारला कसे नागवले, अगदी तसेच.

ह्यांनी त्यांच्या १२ आमदारांना निलंबित केलं. त्याच्या बदल्यात राज्यपालांनी विधान परिषदेच्या १२ आमदारांची नियुक्ती रोखली. केंद्राच्या सर्व संस्था राज्यकर्त्यांच्या पाठी हात धुऊन लागले आहेत. हे एक गुद्दा देतो म्हणतात, तर ते चार गुद्द्यांवर येतात. हे म्हणतात आम्ही तुमच्या अंगावर येणार, तर ते म्हणतात परत कसे जाता ते बघतो. हे काय राजकारणी आहेत कि गाव गुंड? रोज सकाळी उठून संजय राऊत काहीतरी सनसनाटी करायचा प्रयत्न करतात तर रोज संध्याकाळी किरीट सोमैया कसलातरी पोल-खोल करायचं बोलतात. अरे काय चालू आहे? जनतेचे काय प्रश्न आहेत तिथे कधी लक्ष देणार? लोकांना नोकर्या नाहीत, प्रवास कठीण होत चालला आहे, बँका बुडताहेत, लोकांच्या ठेवी बुडताहेत. छोटे उद्योग बसलेत. मध्यम उद्योग पाण्यावर डोके ठेवण्याचा अतोनात प्रयत्न करत आहेत, आणि हे राजकारणी? एकमेकांची उणी-धुणी काढण्यात दंग आहेत. मुंबईचे माजी गृहमंत्री ईडी च्या कोठडीत आहेत. मुंबईच्या माजी पोलीस आयुक्तांची चौकशी चालू आहे. फडणवीसांची तडफड वाढतच चालली आहे. आज फडणवीसांच्या बंगल्यावर त्यांचे समर्थक जमा होते. त्यात एक चेहरा कृपाशंकर सिंग ह्यांचा होता. संताप आला त्यांना सागर बंगल्यावर बघून. फडणवीसांची टीम कोण? दरेकर, राम कदम, प्रसाद लाड. सगळे बाहेरून आलेले. ह्या काल आलेल्या लोकांच्या जीवावर फडणवीस बोंबा मारत आहेत. मुख्यमंत्री आजारी आहेत, गृहमंत्री थंड पडले आहेत, विरोधी पक्षनेते गनिमी कावे करत आहेत आणि किरीट सोमैया पिसाटलेल्या कुायासारखे मिळेल त्याचा चावा घ्यायला दाही दिशा मोकाट सुटले आहेत. फार विदारक दृश्य आहे हे. एक महाराष्ट्रीयन म्हणून मला लाज वाटते आहे ह्या राजकारण्यांची. आज संजय राऊत विरोधी पक्षांना उद्देशून म्हणाले लक्षात ठेवा, हमाम में सब नंगे है. अरे पण आम्हाला कुठे तुम्हाला नंगे बघायचे आहे? ह्यासाठी का तुम्हाला निवडून दिले आहे? ह्या गुंडागर्दीसाठी का तुम्ही त्या पवित्र विधान भवनात बसता? तुमचे हे वागणे म्हणजे लोकांचे प्रतिनिधित्व म्हणायचे का? चालू द्या तुमचे वस्त्रहरण. आम्हाला आमचे प्रश्न आहेत. ते आता आमचे आम्हीच सोडवले पाहिजेत.

# पुरुषोत्तम चव्हाण यांच्यातर्फे महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन



**कल्याण :** शिवसेना शाखा प्रभाग क्रमांक ४० छत्रपती शिवाजी महाराज नगर शाखेच्या ३५ व्यां वर्धापन दिनानिमित्त सोमवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन दिनांक १४ फेब्रुवारी रोजी शिवसेना शाखा प्रभाग क्रमांक ४०, हनुमान मंदिर च्या बाजूला, एफ केबिन रोड, शिवाजी नगर, वालधुनी, कल्याण पूर्व येथे आयोजित करण्यात आले. माजी नगरसेवक पुरुषोत्तम चव्हाण, शाखाप्रमुख समिप काळे, उपशहर संघटक दर्शना समिप काळे, विभाग प्रमुख दयाराम जाधव यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावर्षी महिलांना हळदी कुंकवाचे वाण कापडी पिशवी देण्यात आली. महानगरपालिकेने प्लास्टिक बंदी घालण्यात आली आहे. म्हणून महिलाना कापडी पिशवी देण्यात आल्या. शाखा प्रभाग क्रमांक ४० यांच्यामार्फत नेहमीच प्रभागात आणि समाजोपयोगी कार्यक्रम राबविले गेले. कोरोणा काळातही नागरिकांना घरोघरी जाऊन अन्नधान्याचे किट व जेवणाची सोय करण्यात आली. पूर परिस्थिती ही नागरिकांना अन्न



पोचवण्यात आले. शिवसेना म्हटले की ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण या अनुषंगाने प्रत्येक शिवसैनिक हा फक्त समाजकारण करत असतो. यावेळी सर्व पदाधिकारी उपशाखाप्रमुख गटप्रमुख, महिला आघाडी, युवा सेना व ज्येष्ठ शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश दत्ता उरणकर यांचा ऑल इंडिया रेल्वेत प्रथम क्रमांक



**कल्याण :** गणेश दत्ता उरणकर हे रेल्वेत स्पोर्ट जॉब करत आहे. गणेश उरणकर यांनी रेल्वेत अनेक पदक मिळवून दिले. चेन्नईत त्यांचा ऑल इडीया रेल्वेत प्रथम क्रमांक आला. गणेश यास गोल्ड मेडल मिळाले.

यावेळी वडील दत्ता उरणकर, आई वच्छला उरणकर, भाऊ मनीष उरणकर, हरीश उरणकर, अविनाश कदम, सुरेश कदम , संजय कदम, अशोक कदम ,विलास कदम, विघ्नेश कदम, अर्चना कदम, वैशाली कदम, यश कदम, आदिती कदम, अक्षदा कदम, साहिल कदम तसेच सर्व कदम कुटुंबीयांनी व रोहिदास तरुण मित्र मंडळ यांनी गणेश उरणकर यास शुभेच्छा दिल्या.

# राहुल पाटील यांच्यावतीने आडवली ढोकळी मध्ये श्री गणेश मूर्ती प्रतिष्ठापना व महाप्रसाद



**कल्याण :** राहुल पाटील यांच्या वतीने कल्याण पूर्व येथील संमेक कॉलेज समोर श्री गणेश मूर्ती प्रतिष्ठापना निमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. १२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी पर्यंत विविध पूजा पाठ, होम हवन, आरती, पंचामृती पूजा, तत्व विधि पूजा अशा कार्यक्रमाच्या रुपरेषेत कार्यक्रम संपन्न झाला.

श्री गणेश मूर्ती प्रतिष्ठापना निमित्त विविध नेतेमंडळी आडवली ढोकळी प्रभागातील भक्तगणांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली. यावेळी आडवली ढोकलीची परिस्थिती लवकरात लवकर सुधरू दे, नागरिकांसाठी चांगले रस्ते बनू दे, प्रत्येकाचे आरोग्य निरोगी रहावे यासाठी भक्तगणांनी गणराया चरणी साकडे घातले.

राहुल पाटील हे नेहमीच आपल्या प्रभागात अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवीत असतात. नागरिकाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. यावेळी राहुल पाटील यांचे संपूर्ण कुटुंबीय उपस्थित होते. आलेल्या मान्यवरांनी राहुल पाटील यांचे आभार मानले.

# दिपेश म्हात्रे यांच्यातर्फे महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन

**डोंबिवली (खुशी ) :** दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. आयोजक माजी महापौर उपजिल्हाप्रमुख पूंडलिक बाळू म्हात्रे, माजी नगरसेविका रत्नाताई पुंडलिक म्हात्रे, माजी नगरसेवक जयेश पुंडलिक म्हात्रे, स्थायी समिती सभापती, नगरसेवक, जिल्हा युवासेना अधिकारी, दीपेश पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या प्रभागातील महिलांसाठी हळदीकुंकू





कार्यक्रमाचे आयोजन केले.

गेल्या दोन वर्षापासून कोरोणामुळे कोणतेही सण साजरे करता आले नाही.महिलांना आपल्या दैनंदिन जीवनातून एक दिवस आनंद मिळावा. स्वराज्य महिला मंडळ यांच्या मार्फत सौभाग्याचं लेणं हळदी कुंकू समारंभाचे आयोजन १३ फेब्रुवारी रोजी सह्याद्री कार्यालय समोर मैदान, ठाकुरवाडी, डोंबिवली पश्चिम येथे आयोजित करण्यात आले.

यावेळी अभिनेत्री सुरेखा कुडची यांनी या हळदीकुंकू समारंभाला भेट दिली आणि महिलांशी संवाद साधला. कार्यक्रमास महिलांसाठी अनेक घरगुती बक्षिसे ठेवण्यात आले. लकी ड्रॉ काढून आकर्षक बक्षिसे देण्यात आले. यात प्रथम पारितोषिक सोन्याची नथ, वॉशिंग मशीन, अनेक पैठण्या, मिक्सर, ज्युस ग्राइंडर, टोस्टर मशीन, स्वयंपाकात वापरण्यात येणारी भांडी, फ्राय पॅन, चोपर मशीन, अशा अनेक घरगुती वस्तू लकी ड्रॉमध्ये महिलांना देण्यात आले. यावेळी महिलांसाठी खास मराठी संगीताचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# समाज सेवक दिनेश पाटील यांच्या संयोजनाने 'आई एकविरा देवी नवीन मूर्ती प्राण प्रतिष्ठा' संपन्न



**कल्याण :** आई एकविरा देवी नवीन मूर्ती प्राण प्रतिष्ठा आणि कलश स्थापना विधी बारावे गाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.समाज सेवक दिनेश पाटील यांच्या आईने बधितलेले स्वप्न त्यांनी साकार केलेले आहे. दिनाक १४ फेब्रुवारी रोजी आई एकविरा मंदिर , शिव पाडा , बारावे गाव,कल्याण,(प) येथे हा आनंद सोहळा पार पडला.

यावेळी गणेश पाटील, उषाबाई गणेश पाटील, दिनेश पाटील, हर्षाली दिनेश पाटील, विकास पाटील, पूजा विकास पाटील, पाटील कुटुंबीय उपस्थित होते. शनिवारी मूर्ती अभिषेक आई एकविरा मंदिर कार्ला येथे करण्यात आले. तसेच मिरवणूक बारावे गाव पूर्ण परिसर मध्ये फिरवण्यात आली.

तसेच गणेश पूजन ,कलश पूजन, मातृका पूजन ,वास्तुपूजन ,नवग्रह पूजन ,देवता पूजन, रुद्र पूजन, स्थापित देवता होमहवन, वास्तुशांती, मूर्ती धान्य पूजन व इतर पूजन सोबत हरिपाठ करण्यात आले. याबरोबर जय दुर्गा महिला मंडळ, वाडेघर यांच्यावतीने भजन प्रस्तुत करण्यात आले. सोमवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सकाळी होम-हवन स्थापित देवता पूजन करून भूमिपूजन करण्यात आले.

तसेच मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, कलश स्थापना, महाराज बालयोगी विशालनाथजी गुरु योगी दादानाथजी ( शिवनगर दत्त मंदिर, चौधरपाडा )यांचे शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी बारवे गावचे सर्व ग्रामस्थ आई एकविरा चे सर्व भक्त तसेच परिवार आपली उपस्थिती लावली तसेच भंडाराचा देखील लाभ घेतला. यावेळी दिनेश पाटील यांनी सांगितले की, मला आनंद आहे की मी माझ्या आईच स्वप्न पूर्ण केलं.यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे पाटील कुटुंबीय तर्फे आभार मानण्यात आले . कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी पाटील कुटुंबीयांनी मेहनत घेतली.

# डोंबिवलीत समीक्षा संमेलनाची जोरदार तयारी

**डोंबिवली :** ठाणे जिल्ह्यातील पहिले समीक्षा संमेलन डोंबिवलीत भरवण्याची तयारी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या डोंबिवली शाखेने सुरू केली आहे. समीक्षा रसिक वाचकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहचावी, रसिकांना साहित्य साक्षर केले जावे. ती वाचकाभिमुख व्हावी या उद्देशातून डोंबिवलीत हे संमेलन भरविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे डोंबिवली शाखेचे कार्याध्यक्ष, लेखक सुरेश देशपांडे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यात भरणारे हे पहिलेच समीक्षा संमेलन आहे, असे साहित्य परिषदेच्या डोंबिवली शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. साहित्य परिषद डोंबिवली शाखेचे अध्यक्ष वामनराव देशपांडे, कार्याध्यक्ष सुरेश देशपांडे, कार्यवाह प्रा. डॉ. धनश्री साने, उपाध्यक्ष दीपाली काळे यांच्या मार्दर्शनाखाली संमलेनाचे नियोजन केले जात आहे.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**

पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.

साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

....पान १ वरुन.. हौशी नाट्य महोत्सव

संस्थांना आचार्य अत्रे रंगमंदिरात नाट्यप्रयोग सादर करण्याची संधी दिल्याबद्दल नाट्यवर्तुळात श्री. शिवाजी शिंदे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. समारोप समारंभात ज्येष्ठ रंगकर्मी मेघन गुप्ते यांनी सहभागी संस्थांच्या वतीने श्री. शिवाजी शिंदे यांचे आभार मानत गेल्या साठ वर्षाच्या माझ्या कारकिर्दीत प्रथमच कल्याण शहरात असा नाट्य महोत्सव साजरा होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या समारोप समारंभात सांस्कृतिक संचालनालय कार्यक्रम अधिकारी सौ. अलका घोडके तसेच सुरेश पवार, मंगेश नेहरे, रविंद्र सावंत, स्वप्नील भिसेकर, सतीश देसाई असे सिने-नाट्य क्षेत्रातील मान्यवर व्यासपीठावर होते. सुजाता कांबळे डांगे, ऐश्वर्या भारगुडे, करुणा कातखडे, हेमंत यादगिरे, स्वप्निल चांदेकर, सुरेश शिर्के, संजय गावडे, विशाल पितळे व अत्रे रंगमंदिर व्यवस्थापन यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास सोनवणे यांनी केले.

# बॅनर्स, शेड्सवर तसेच पदपथांवरील अतिक्रमणावर निष्कासनाची धडक कारवाई




**कल्याण :** कल्याण डोंबिवली नगरी अधिकाधिक चांगली, सुंदर दिसावी तसेच महापालिका परिसरातील नागरिकांना पदपथावरुन चालणे सोयीचे व्हावे या दृष्टीकोनातून आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतील कायापालट अभियान सर्वत्र राबविले जात आहे याच अभियानांतर्गत ग प्रभागाच्या सहा. आयुक्त रत्नप्रभा कांबळे यांनी डोंबिवली पूर्व येथील दत्तनगर, रामनगर परिसरातील ३५ बॅनर्स हटविण्याची धडक कारवाई केली.

त्याचप्रमाणे जे प्रभागातही सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी कल्याण पूर्व काटेमानिवली रोड, वालधुनी, जकात नाका या परिसरातील ४१ बॅनर, होर्डिंग काढण्याची धडक कारवाई केली.

५/ड प्रभागातही सहा. आयुक्त सविता हिले यांनी कल्याण पूर्व परिसरात पुनालिंक रोड ते विजय नगर, आमराई या रस्त्यावरील फुटपाथवर दुकानदारांनी केलेले अतिक्रमण /वेदर शेड/बाकडे/हातगाड्या इत्यादींवर निष्कासनाची धडक कारवाई केली.

६/फ प्रभागात सहा. आयुक्त किशोर शेळके यांनी डोंबिवली पूर्व येथील कल्याण रोड, नेहरू रोड, फडके रोड , मानपाडा रोड येथील सुमारे ४९ बॅनर्स काढण्याची धडक कारवाई केली.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ कल्याण डोंबिवली शहर जिल्हा आयोजित संत रोहिदास जयंती संपन्न



**कल्याण :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ कल्याण डोंबिवली शहर जिल्हा आणि 'मी कल्याणकर' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४५ वी जयंती कल्याण पूर्वेतील ऑक्सिजन पार्क गणेशवाडी या निसर्गरम्य ठिकाणी अगदी भक्तिभावाने संपन्न झाली.

विशेष म्हणजे सर्वप्रथम या प्रसंगी सुरेश पवार यांनी रचनाबद्ध केलेली संत रविदास महाराज यांची सर्वांगसुंदर आरती उपस्थित मान्यवरांसह समस्त समाज बंधू भगीनिंनी मोठ्या जयघोषात सादर केली. तसेच या शुभ प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माजी नगरसेवक व मी कल्याणकर संस्थेचे अध्यक्ष आणि चर्मकार समाज बांधव मा.नितीन महारू निकम यांना समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच बरोबर सुप्रसिद्ध समाजकार्यकर्ते व नाट्य लेखक दिग्दर्शक आणि अभिनेते सुरेश शांताराम पवार यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सदर पुरस्कार स्वरूपात मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, आणि रोख रु. ३०००/- प्रदान करण्यात आले. या दोन्ही मानपत्राचे वाचन कल्याण-डोंबिवली शहर जिल्हा अध्यक्ष राम बनसोडे यांनी केले. तसेच या जयंती दिनी चर्मकार समाजातील गरीब आणि विधवा अशा महिलांना अन्नधान्य किटचे ही वाटप करण्यात आले.

या जयंती सोहळ्यासाठी सर्वश्री माजी डीवायएसपी नारायण राजगुरू, आदर्श शिक्षक राष्ट्रपती पदक विजेते रमेश हंकारे गुरुजी, नगरसेवक महेश दादा गायकवाड, नगरसेविका सुमन ताई निकम, नाट्य परिषद कल्याण शाखा अध्यक्ष शिवाजी शिंदे, ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष नरेंद्र बोराडे, कोकण विभाग अध्यक्ष गौतम बळवंते, समाज सेवक रमाकांत देवळेकर, लक्ष्मण आंबोकर, सुरेश जाधव, माजी नगरसेविका मीनाक्षी डोईफोडे, भारती कुमरे, समाजसेविका मंदाताई जाधव, आदी मान्यवरांसह शेकडो समाज बंधू-भगिनी आवर्जून उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संत रोहिदास जयंती निमित्त समस्त चर्मकार समाज बंधू-भगिनींना शुभेच्छा देतांना मौलिक मार्गदर्शनही केले.

या जयंती सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री राम बनसोडे, गजेंद्र राऊत, प्रमोद जळगावकर, मनोज रोकडे, राजकुमार राऊत, मनोज वाघमारे, बालाजी राऊत, लहू शेवाळे, रुपेश भोईर, सोमनाथ राऊत, दिलीप वाघमारे, संजय वाघमारे, जयेश कदम, ललिता साबळे, बाळासाहेब वाघमारे, निवेदक जालिंदर सूर्यवंशी आणि मी कल्याणकर या संस्थेने विशेष परिश्रम घेतले.

# क प्रभाग परिसरात निष्कासनाची धडक कारवाई सुरुच

**कल्याण :** महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व सहा. आयुक्त यांना दिलेल्या निर्देशानुसार क प्रभागाचे सहा. आयुक्त सुधिर मोकल यांनी कल्याण पश्चिम येथील जय मल्हार हॉटेल शेजारी असलेल्या २ टप-या



निष्कासनाची धडक कारवाई केली तसेच खडकपाडा परिसरातील २ भंगार चारचाकी वाहने उचलून खंबाळपाडा येथील वाहन तळावर जमा करण्याची कारवाई केली.

सदर कारवाई पथक प्रमुख सुखदेव धापोडकर, अतिक्रमण निर्मुलन विभागाचे कर्मचारी, महापालिका पोलिस कर्मचारी यांचे मदतीने व २ जेसीबी, १ हायड्रा, २ डंम्परच्या सहाय्याने आज करण्यात आली.

# रवींद्र धर्मा पाटील यांच्या माध्यमातून विविध योजना शिबिराचे आयोजन



**डोंबिवली :** आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली ग्रामीण सरचिटणीस रवींद्र धर्मा पाटील आणि भाजपा निळजे लोधा पलावा शहर अध्यक्ष महिंद्र धर्मा पाटील यांच्या वतीने आधार कार्ड आणि सुकन्या योजना शिबिराचे आयोजन रवींद्र पाटील यांचे जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.

आधार कार्ड शिबिरामध्ये नवीन आधार कार्ड बनविणे, नाव दुरुस्ती, मोबाईल नंबर लिंक आदी सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या. तर सुकन्या योजना शिबिरामध्ये मुलींच्या पुढील भवितव्यासाठी लागणारे विमा, पॉलिसी ऑनलाइन रजिस्टर करून उपलब्ध करून देण्यात आला. यावेळी महादेव लोंखडे ,सतीश सिंग, दिनेश काकतकर ,अमित चिकणकर, अजित सिंग, मनू मैस्त्री, हेंमत गुरव, दिपक रिकामे ,जितेंद्र पाटील आदी पदाधिकारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यसम्राट आमदार गणपत गायकवाड यांच्या उपस्थितीत शिवजयंती साजरी



**कल्याण :** कल्याण पूर्व येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आपले लाडके कार्यसम्राट आमदार गणपत गायकवाड यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी' अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

यावेळी आमदार गणपत गायकवाड, नाना सुर्यवंशी, नगरसेवक मनोज राय, हेमलता पावशे, विजय उपाध्याय, सुभाष म्हस्के, संदीप तांबे, गुड्डू खान, नितीन शिंदे, जितो शिर्के, वंदना मोरे, सुमती गायकवाड, मीना टोकेकर, श्रुती पाटील, सारिका जाधव तसेच सर्व बिजेपी कार्यकर्ते उपस्थित होते .यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष उदय जाधव यांच्या कार्यालयात शिवजयंती संपन्न

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही १९ फेब्रुवारी म्हणजे शिवजयंती कल्याण रामदासवाडी



राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष उदय जाधव यांच्या कार्यालया येथे मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती संपन्न झाली. दरवर्षी भव्य मिरवणूक काढण्यात येते पण गेल्या दोन वर्षापासून कोरोना असल्याकारणाने शिवजयंती साजरी करता आली नाही. यावर्षी मोठ्या जल्लोषात साजरी केली उदय जाधव आणि नंदिनी उदय जाधव यांच्या वतीनेही शिवजयंती साजरी करण्यात आली त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला. आलेल्या मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा केला नंतर अनेक मान्यवरांनी महाराजांच्या विषयी लोकांना माहिती देऊन संबोधित केले.

या कार्यक्रम प्रसंगी संजय जाधव, सुखदेव कापुरे, राजन पवार, दिपक थोरात, गणेश शिंदे, छगन शिंदे, कुणाल पंडित, भगवान उर्फ दासी साठी, राजू पाटील, पियुष मजुमदार, शकील बागवान, अलीम बागवान, अन्सार सय्यद बागवान, कंचन साठे, साईना सय्यद, इन्सा अन्सारी, विजय चव्हाण, केतन पंडित, भूषण भानुषाली, दिलीप देवकर, राहुल पवार, वसंत केणे, दीपक वेदपाठक, रामदास कनोजे, प्रदीप मोहिले, नाना कारके, तुकाराम पाटील, गोपाळ काका, चौधरी काका आदी मान्यवर मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# राकेश दादा कदम तसेच कुणाल पाटील फाऊंडेशन यांच्यावतीने शिवजंयती साजरी

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यावर्षीही स्वर्गीय राकेश दादा कदम युवा मित्र मंडळ तर्फे तसेच



कुणाल पाटील फाऊंडेशन वतीने दिनांक १९ फेब्रुवारी शिवजयंती उत्सव आयोजित करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवज्योतीसह मिरवणूक काढत शिवजयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली.

अडवली-ढोकली परिसरात माजी नगरसेवक कुणाल पाटील यांच्या नेतृत्वात ही शिवज्योतीची मिरवणूक काढीत छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजारा करण्यात आला. स्वराजची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवाजी महाराज यांचा इतिहास नव्या पिढी समोर ठेवण्यासाठी स्वर्गीय राकेशदादा युवा मित्र मंडळ यांच्या सौजन्याने या शिवज्योत मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. गेल्या ६ वर्षापासून आपण लेझीम पथका सोबत मशाल स्वागत काका ढाबा ते कुणाल दादा जनसंपर्क कार्यालय पर्यंत शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. मोठ्या सखेने नागरिक यावेळी उपस्थित होते. गायत्री विद्यालय चे विद्यार्थ्यांनी लेझीम पथक व पोवाडे गायले. तसेच अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.

या वेळी उद्योगपती समाजसेवक आनीलदादा पाटील, कार्यक्रमाचे आयोजक अल्पेश दात खिळे, कपिल गोर, विरेश राठोड, कल्पेश भोईर, मिसे सर, नवनाथ दराडे, कदम काका, शिंदे मॅडम, श्रुती मॅडम, सूत्र संचालन नयन सर, रोहित आल्हाड, राज मोरे, सोमनाथ साळुंके, सौरभ सिंग, संकेत पारे, मनोज शिंदे, संकेत चोरगे, करण सावंत, अशोक गाडे आदी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते.

# भगवान म्हात्रे व अमृता म्हात्रे यांच्यावतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**कल्याण :** कल्याण पश्चिम गौरीपाडा तलाव येथे भारतीय जनता पार्टीचे कल्याण शहर उपाध्यक्ष भगवान म्हात्रे आणि समाज सेविका अमृता भगवान



म्हात्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

सर्वप्रथम महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. तसेच शहापूरचे शिव व्याख्याते शिव श्री रिकी खाडेसर यांचे व्याख्यान माला खास कार्यक्रम नागरिकांसाठी आयोजन करण्यात आले.

भगवान म्हात्रे यांनी यावेळी लोकांना संबोधित करताना सांगितले की, लोकांनी महाराजांचे विचार मनात ठेवून काम केले पाहिजे. कुठल्या प्रकारचा भेदभाव न करता समाजासाठी लढले पाहिजे. तसेच महिलांचे रक्षण करणे, त्यांचा आदर करणे या गोष्टी लोकांनी केल्या पाहिजे. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी शहराध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे, ज्येष्ठ नागरिक तलाव कट्टा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार रवींद्र म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस अर्जुन म्हात्रे, माजी नगरसेवक अर्जुन भोईर, श्याम केने, शाम मिरकुटे, प्रिया शर्मा, सीमा सिंग, दिपाली दातिर, रोहिदास म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, भरत पाटील, निलेश सम्राट, संजय कारभारी, मेघनाथ भंडारी, ज्येष्ठ नागरिक महिला यावेळी उपस्थित होत्या. तसेच यावेळी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आजी-माजी नगरसेवक या कार्यक्रमास उपस्थित होते.

....पान १ वरुन.. सचिन शिरसाट चषक २०२२ चे आयोजन

निलेश अष्टेकर , निलेश साळकर, अक्षय शिरसाट, गौरव लिंगायत, भावेश बिडवी, मयुर बाविस्कर, मिनी सपकाळ, गीतेश मराठे, मेहुल पांचाळ, भरत बाविस्कर, संतोष झोडगे सर्व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. सूत्र संचालन विजय सर यांनी केले. यावेळी आलेल्या संघांनी सचिन शिरसाठ यांचे आभार व्यक्त केले. सचिन शिरसाठ हे नेहमीच आमच्या सारख्या युवा पिढीला मार्गदर्शन करतात. प्रभागात नागरिकांच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करतात.सचिन शिरसाठ आणि मयुरी शिरसाठ हे दापत्य नेहमीच आपल्या प्रभागात अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवीत असतात.

नियमित वाचा कल्याण डोंबिवली व्हिजन

# भगवान बाळाराम म्हात्रे व अमृता म्हात्रे यांच्यातर्फे महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ



**कल्याण :** भारतीय जनता पार्टी कल्याण पश्चिम प्रभाग क्रमांक ३ गौरीपाडा बारावे गोदरेज हिल येथे कल्याण शहर उपाध्यक्ष भगवान बाळाराम म्हात्रे व समाजसेविका अमृता भगवान म्हात्रे यांनी खास महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, खेळूया खेळ पैठणीचे आणि रांगोळी स्पर्धेचे बक्षीस समारंभ या वेळी करण्यात आले.

गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा भगवान म्हात्रे आणि अमृता म्हात्रे यांच्या तर्फे सर्व महिलांसाठी रविवारी १३ फेब्रुवारी रोजी कर्नाळा देवी मंदिर गौरीपाडा तलाव कल्याण पश्चिम येथे हळदीकुंकू आणि खेळूया खेळ पैठणीचे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच दिवाळीनिमित्त भव्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याचे बक्षीस वितरण या वेळी करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती खासदार भिवंडी लोकसभा केंद्रीय राज्यमंत्री पंचायत राज्य कपिल मोरेश्वर पाटील, माजी मंत्री भाजपा जगन्नाथ पाटील, कल्याण शहर अध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे, माजी नगरसेवक जिल्हा सरचिटणीस युवा वरूण पाटील, चंपाबाई म्हात्रे, ठाणे जिल्हा ग्रामीण संपर्क प्रमुख राजाभाऊ पातकर,जिल्हा सरचिटणीस अर्जुन म्हात्रे, पोलीस पाटील रघुनाथ म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

भगवान म्हात्रे आणि अमृता म्हात्रे यांनी आपल्या प्रभागात नेहमी समाजोपयोगी कार्यक्रम राबवित असतात. समाज कल्याणासाठी नेहमीच दोघेही कार्यरत असतात. नागरिकांच्या कोणत्याही समस्या असो त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. आतापर्यंत त्यांनी आपल्या प्रभागात लसीकरण शिबिर, आरोग्य शिबिर असे अनेक शिबिरांचे आयोजन त्यांनी केले आहे. यावेळी परिवहन सदस्य स्वप्नाली काटे, अशोक मिरकुटे, दत्ता गायकवाड, मनीषा केळकर, सीमा सिंग, दशरथ म्हात्रे, श्याम केने, श्याम मिरकुटे, लक्ष्मण म्हात्रे ,अजित म्हात्रे, रोहिदास म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, महेश केने, मोहन ढोणे, आशिष तिवारी, संजय कारभारी, जनार्दन कारभारी, प्रताप ठुंमकर, दिपाली दातीर, रंजना गंभीरराव, विजया जाधव, संगीता पाटील, पौर्णिमा मोरे, हर्षल म्हात्रे, आशा मिरकुटे, गायक तुकाराम घणसोलकर, मयुर म्हत्रे, प्रभात म्हात्रे, सुदर्शन मुकादम, सुमित म्हात्रे, तुषार म्हात्रे, सुशांत म्हात्रे, किरण म्हात्रे, कल्पेश म्हत्रे, राजेश म्हत्रे, हेमंत म्हात्रे, यश म्हात्रे, तनय म्हात्रे, सुमित पाटील, खेळ खेळूया पैठणीचे कार्यक्रमाचे प्रस्तुत प्रणव भांबुरे यांनी केले.

यावेळी आलेल्या मान्यवरांचे हस्ते सर्वांना बक्षीस देण्यात आले. यावेळी खेळुया खेळ पैठणी मध्ये पैठण्या आणि आकर्षक बक्षिसे देण्यात आले. मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. यावेळी नवविवाहित वधू लाही हळदी कुंकाचे वाण देण्यात आले. आलेल्या मान्यवरांचे भगवान म्हात्रे व अमृता म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले

# महाकालेश्वर चारीटेबल ट्रस्ट द्वारे आयोजित श्री कालभैरव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

## संजीवनी ताई पाटील यांच्या वतीने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन



**कल्याण :** महाकालेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट द्वारे श्री कालभैरव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा समारंभा निमित्त वाडेघर महाकाल मंदिरात दरवर्षप्रमाणेच भव्य महाप्रसादाचे आयोजन संजीवनी ताई रमेश शेठ पाटील यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. तसेच ट्रस्ट अध्यक्ष संजीवनी ताईंच्या वतीने महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन देखील करण्यात आले होते. कल्याण पश्चिम आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यावेळी दिसून आली. महिलांमधील स्नेह आणि गोडवा कायमचा टिकावा, या उद्देशाने तिळगुळ वाटप आणि हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यात सर्व वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. समारंभामध्ये ज्येष्ठ महिला आणि नवविवाहित महिलांच्या उखाण्यांनी रंगत आणली.

संजिवनी ताई दरवर्षी प्रभागातील महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करतात. प्रभागातील मूलभूत सुविधा, पायाभूत सुविधा ही कामे मार्गी लावत प्रभागाचा विकास, अडीअडचणीला तळागाळातील लोकांच्या मदतीला जाण्याचा वसा कायम सुरू असून यंदा कोरोना पार्श्वभूमीवर लॉक डाऊन शीतलतामुळे महिला वर्गाला दिलासा देत क्षणभर हास्य, भेटवस्तू अर्थात वान यांची पर्वणी यानिमित्ताने उपलब्ध करून दिली. हळदी कुंकू समारंभा मध्ये मोठ्या संख्येने महिलांनी आपली उपस्थिती लावत समारंभाचा आनंद घेतला. यावेळी मोठ्या संख्येने महिला आघाडी उपस्थित होते. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# नगरसेविका नीलिमा पाटील तसेच माजी नगररसेवक संजय हरिभाऊ पाटील यांच्या प्रयत्नाने रस्त्याचा निधी मंजूर



**कल्याण :** शिवसेना शाखा २४ प्रभाग क्रमांक ८ माजी नगरसेविका नीलिमा संजय पाटील तसेच माजी नगरसेवक संजय हरिभाऊ पाटील यांनी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे व कल्याण पश्चिमचे शिवसेनेचे आमदार विश्वनाथदादा भोईर यांच्याकडे पाठपुरावा करून रस्त्याचे निधी मंजूर करून घेतला.

संपदा हॉस्पिटल ते छोटा म्हसोबा येथील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे व नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचे भूमिपूजन आमदार विश्वनाथ दादा भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. उत्तम प्रकारची रस्त्याचे कामे होतील जनतेची कामे करणे ही शिवसेनेची काम आहे. ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण या अनुषंगाने सर्व शिवसैनिक निस्वार्थ काम करतात.नीलिमा पाटील, संजय पाटील तसेच सोसायटीतील नागरिकांनी आमदार व विश्वनाथ दादा भोईर यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित प्रभागाचे नगरसेविका नीलिमा ताई पाटील, माजी नगरसेवक संजय हरिभाऊ पाटील, शिवसेनेचे शाखाप्रमुख गणेश कोते, उपविभागप्रमुख तुकाराम टेमघरे, अखिल भाई युवा सेना पदाधिकारी सिद्दिकी संघर्ष सेना ऑटो रिक्षाचे अध्यक्ष महेंद्र मिश्रा इतर सर्व रिक्षा चालक मालक व सर्व शिवसैनिक पदाधिकारी तसेच महिला आघाडी कल्पना मॅडम, अर्चना ताई , मुरुडकर मॅडम उपस्थित महिला व शिवसैनिक पदाधिकारी तसेच प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते विकास कामांचा शुभारंभ



**मोहने :** आमदार विशवनाथ भोईर यांच्या निधीतून गाळेगाव पंचशील नगर येथील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ तसेच खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या निधीतून हिंदी हायस्कूल येथे सिमेंट रस्त्याच्या भुमीपूजन, इत्यादी कामांचा शुभारंभ करण्यात आला,

स्थानिक नगरसेवक दयानंद शेट्टी यांनी आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून गाळेगाव पंचशील नगर येथील सिमेंट कॉंक्रटिकरण कामाकरिता निधी मंजूर करून घेतला. यावेळी माजी नगरसेवक दयानंद शेट्टी, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य व माजी नगरसेवक मयूर पाटील, उपविभाग प्रमुख अंकुश जोगदंड, उपशहर प्रमुख विजय काटकर, शिवसैनिक राम तरे, रोहन पांडुरंग कोट, रवी उल्हारे, युवा सेना शहर अधिकारी मोहोने टिटवाळा दिनेश निकम, शाखा प्रमुख राजेश पाटील, सुहास ओटे, नितीन आवटे, कैलास स्थानिक नागरिक शिवसैनिक, युवा सैनिक, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पांडुरंग संते यांच्या सहकार्याने किंग ट्रॉफी चे २०२२ आयोजन



**डोंबिवली :** ग्रामीण क्रिकेटचा वर्ल्ड कप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किंग ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन डोंबिवली पूर्वेतील व्ही. सी. सी. उसरघर, किंग मैदानात करण्यात आले होते. ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १,५०,००० प्रथम पारितोषिक, ७५,०००द्वितीय, ५०,००० तृतीय, चतुर्थ, पाचवे आणि सहावे पारितोषिक ३०,००० ठेवण्यात आले होते. समाजसेवक पांडुरंग संते यांच्या सहकार्याने भव्य दिव्य अशा किंग ट्रॉफी २०२२ चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत मालिकावीर, उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज, क्षेत्ररक्षक यांना आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. जय जलेश्वर संघ वाडेघर यांनी प्रथम पारितोषिक पटकाविले, द्वितीय गावदेवी R M ११ सोणारपाडा, तृतीय ओम साई आगासान यांनी पटकाविले.

यावेळी आमच्या स्पर्धेच्या माध्यमातून विविध खेळाडू उच्च स्तरापर्यंत पोहोचले आहेत. त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने आम्ही स्पर्धा भरवत असतो अशी स्पष्टोक्ती मनसे सैनिक तथा काटई गावचे माजी सरपंच काशिनाथ पाटील यांनी केली आहे. यावेळी उसरघर गावचे माजी सरपंच योगेश पाटील, मनसेचे क्रांती पाटील, कांचन पालकर, समलोचक रवी म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रुपेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून ६ हजार वृक्षारोपांच्या माध्यमातून शिवप्रतिमेची छबी साकार



**कल्याण :** गेल्या ३६ वर्षांची परंपरा असलेल्या कल्याण पूर्व येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या विद्यमाने यावर्षीच्या शिवजयंतीनिमित्त शिवरायांना वंदन करण्यासाठी ६ हजार वृक्षारोपांच्या माध्यमातून शिवप्रतिमेची छबी साकारण्यात आली आहे. गावातील तीसाई देवी मंदिराच्या प्रांगणात साकारण्यात आलेली ही प्रतिमा शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रुपेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून आणि कलेतून साकारण्यात आली आहे. शिवप्रतिमेची ही कलाकृती प्रत्यक्ष कृतीत उतरण्यासाठी रुपेश गायकवाड हे स्वत: गेली महिनाभर आपल्या निवासस्थानी प्रायोगिक पद्धतीने सराव करीत होते. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून ही कलाकृती देवीच्या चरणी समर्पित करण्यात आली आहे.

गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही शिवजयंती उत्सवावर कोरोनाचे संकट कायम असल्याने यावर्षीही १९ फेब्रुवारी रोजीच्या शिवजयंती दिनी तीसाई देवीच्या प्रांगणात शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने शिवप्रतिमेचे पूजन होणार असून त्यानंतर विविध संस्था संघटनांना वृक्षारोपणाचे प्रतिनिधिक स्वरुपात वाटप करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे शिवजयंतीच्या दुसऱ्या दिवशी शिवप्रतिमेचे वापरण्यात आलेल्या वृक्ष रोपांचेही विविध संस्था संघटनांना वृक्ष वाटप करण्यात येणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष रुपेश गायकवाड, सचिव राजू अंकुश आणि विश्वस्त नरेंद्र सूर्यवंशी यांनी सांगितले.

नियमित वाचा
कल्याण डोंबिवली व्हिजन

# सकल मराठा फाउंडेशनतर्फे शिवजयंती महोत्सवाचे आयोजन

**कल्याण :** सकल मराठा फाउंडेशन, भारतीय मराठा संघ कल्याण पूर्व आयोजित शिवजयंती महोत्सव २०२२ आयोजन करण्यात आले. कल्याण पूर्व, शंभर फुटी रोड हॉल बाजूला करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर




व्याख्यान करण्यात आले . कार्यक्रमा प्रसंगी लकी ड्रॉ काढण्यात आले. लकी ड्रॉ मध्ये पैठणी तसेच सोन्याची नथ व आकर्षक बक्षीसे महिलांना देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.'जय भवानी जय शिवाजी' अशी घोषणा करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमाप्रसंगी आपली उपस्थिती लावली. तसेच या कार्यक्रमाबद्दल शुभेच्छा देखील दिल्या.

Printed, Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed At SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT.LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai-Dist. Thane. MAHARASHTRA - 400710 Published From - Flat No 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp - Birla College Chickanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist - Thane. Pin Code - 421 301 - (Maharashtra) Mob. 09987496136, 09619630035, 08655004586 (REGD.NO. MAHBIL/2014/56983 Email - kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया, ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे, एमआयडीसी ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१० जि. ठाणे - ४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे -४२१३०१ येथून छापून प्रकाशित केले (रजि. नं. एमएएचबीआयएल २०१४/५६९८३)